






# महाराष्ट्र शासन
# अर्थसंकल्प : २०१७-१८
# नगर विकास विभाग

समर्थन

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**
११५- समर्थन, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई स्थानकासमोर,
वसई (पू), पालघर -४०१ २०८ ☎ ०२५०-२३९०१०३/४
Email: samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

**समर्थन**

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन :
**मुक्ता भारती**

संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
**मॅकेन्झी डाबरे** - ९६६५००६४२९

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**
**सोनल सहस्त्रबुद्धे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई १५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा,
वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# पुस्तिका वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत  यासाठी असतात.
- सदर माहिती पुस्तिकेचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव  टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे  नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१०-११ पासून २०१७-१८ पर्यंत अर्थसंकल्पातील  प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.

- विवेक पंडित
संस्थापक, समर्थन
९८२३१४७००३
pvivek2308@gmail.com

# नगर विकास विभाग

**प्रस्तावना :**

संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य हे नागरीकरण क्षेत्रात आघाडीवर आहे. लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ४५% इतकी लोकसंख्या नागरी भागात वास्तव्य करते. हे प्रमाण देशातील इतर राज्यांपेक्षा सर्वात अधिक आहे. महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२३ कोटी असून नागरी क्षेत्रातील लोकसंख्या ५.०८ कोटी आहे. ही नागरी लोकसंख्या बहुतांशी करू.न पुणे, मुंबई, नागपूर अशा महानगरीय क्षेत्रात केंद्रीत झालेली दिसून येते. राज्यात ३६ जिल्हे असून प्रशासकीय सुविधेसाठी ते कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या ६ महसुली विभागात विभागले आहेत. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी तसेच देशाची आर्थिक राजधानी असून बहुतांशी प्रमुख खाजगी कंपन्या व वित्तीय संस्थांची मुख्यालये या शहरात आहेत. देशातील प्रमुख वायदे व भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्रे मुंबईत आहेत. राज्यात २७ महानगरपालिका, २३० नगरपरिषद व ११० नगर पंचायती आहेत. या शिवाय राज्यात सध्या खालील विशेष नियोजन प्राधिकरणे अस्तित्वात आहेत:-

१. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

२. शहर व औद्योगिक विकास महामंडळ

३. नागपूर सुधार प्रन्यास

४. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

५. तूळजापूर शहर विकास प्राधिकरण

६. पैठण आपेगांव शहर विकास प्राधिकरण

७. पंढरपूर शहर विकास प्राधिकरण

शहर व ग्रामीण भागाचा समतोल राखून विकास होणे गरजेचे आहे. मागील काही वर्षांपासून शासनाचा कल शहरी भागावर आहे. वर्ष २०१७-१८च्या अर्थसंकल्पात रुपये १९ हजार ४१४ कोटी नगर विकास विभागासाठी आहेत. ''विकास नक्कीच हवा पण तो फक्त मूठभरांचा नव्हे तर राज्यातील तळागाळातील व्यक्तीचाही विकास साधणारा असावा. शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा याद्वारे मानवी विकास साधला जावा.

# मोठ्या महानगराभोवती केंद्रीत नगरविकास विभाग

संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य हे नागरीकरण क्षेत्रात आघाडीवर आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ४५% इतकी म्हणजे ५.०८ कोटी लोकसंख्या नागरी भागात वास्तव्य करते. राज्यात सध्या २७ महानगरपालिका व ३३३ नगरपरिषदा व नगरपंचायती आहेत. ही नागरी लोकसंख्या बहुतांशी करून पुणे, मुंबई, नागपूर अशा महानगरीय क्षेत्रात केंद्रीत झालेली दिसून येते.

## नगर विकास विभागाचा अर्थसंकल्प

आलेख क्र. १ (रु. कोटीत)




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ४२०१ | ५६५५ | ६१७० | ६५१६ | ६०३६ | ६९७१ | १७७६२ | १९४१४ |
| सुधारित अंदाज | ४८८५ | ५४१३ | ६०४३ | ६५३६ | ७८९४ | ११९४७ | १७८६१ | |
| प्रत्यक्ष खर्च | ४१६० | ४८१५ | ४५९४ | ५५८६ | ६१८७ | १०५८१ | | |

*(स्त्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, खर्चाचा प्रधानशिर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा)*

*(टीप: वर्ष २०१६-१७ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१७-१८चे अर्थसंकल्पीय अंदाज*

- **२०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १७ हजार ७६२ कोटी होता. २०१६-१७ मध्ये त्या तुलनेत सुधारित अंदाज रुपये १ हजार ६५२ कोटीने वाढून रुपये १९ हजार ४१४ झाले.**
- **२०१६-१७ मध्ये सुधारीत अंदाज रु. १७ हजार ८६१ होता. २०१७-१८ मध्ये त्या तुलनेत अर्थसंकल्पीय अंदाज रुपये १ हजार ५५३ कोटीने वाढून रुपये १९ हजार ४१४ कोटी इतका झाला.**
- **२०१६-१७ अर्थसंकल्पीय अंदाज व २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाजातील तफावत रुपये १ हजार ६५२ कोटी इतकी आहे म्हणजेच जवळजवळ १०टक्के जास्त आहे.**
- **२०१५-१६ मध्ये सुधारित अंदाज रुपये ११ हजार ७४७ कोटी होता प्रत्यक्ष खर्च रुपये १ हजार १६६कोटी कमी होऊन रुपये १० हजार ५८१ कोटी इतका झाला.**

# राज्यातील प्रत्येक नागरिकावर ३९ हजार ५०८ रुपयांचे व्याजासह कर्ज!
# ‘कुणाच्या खांद्यांवर कुणाचे ओझे’

तक्ता क्र. १ (रु. कोटीत)

| प्रकल्पाचे नाव | सुरू झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत | ऑक्टोबर २०१६ पर्यंत खर्च | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| **मुंबई मेट्रो रेल प्रकल्प** | | | | | |
| **टप्पा २ अ -** दहिसर -डी.एन. नगर (१८-६ किमी) | २०१६ | ६,४१० | १.०० | २०२०.२१ | काम प्रगतिपथावर |
| **टप्पा ३ -** कुलाबा - वांद्रे -सीप्झ (३३.५किमी) | २०१५ | २३,१३६ | १४०.०० | २०२०.२१ | |
| **टप्पा ४ -** वडाळा - घाटकोपर - ठाणे - कासारवडवली (३२ किमी) | २०१६ | १४,५४९ | -- | २०२०.२१ | स्थापत्य कामे प्रगतिपथावर |
| **टप्पा ७ -** अंधेरी (पू) - दहिसर (पू) | २०१६ | ६,२०८ | ६२.१३ | मार्च २०१९ | स्थापत्य कामांसाठी कंत्राटदाराच्या नेमणूकीची निविदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर |
| **मुंबई मोनो रेल प्रकल्प** | | | | | |
| **पहिला टप्पा -** वडाळा ते चेंबूर ( ८.९३ किमी) | २००८ | २,४६० | २,३३७ | मार्च २०१७ | काम पूर्ण |
| **दुसरा टप्पा -** संत गाडगेमहाराज चौक (जेकब सर्कल) ते वडाळा (११.२०किमी) | | | | | ९८ टक्के काम पूर्ण |
| **एमयुआयपी** | | | | | |
| रस्ते, उड्डाणपूल, भुयारी मार्ग इ. (१८ रस्ते) | २००३ | ३,२०७ | ४७५७.४१ | एप्रिल २०१८ | १.सर्व रस्ते पूर्ण<br>२. उर्वरित कामे प्रगतिपथावर |
| वांद्र-कुर्ला संकुल (जी-ब्लॉक) ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान उन्नत मार्ग बांधणे. | | | | डिसेंबर २०१७ | वांद्र-कुर्ला संकुलाजवळ मिठी नदी, कॉलनी मार्ग व सोमय्या मैदान येथे काम प्रगतीपथावर |
| **विस्तारित एमयुआयपी** | | | | | |
| **टप्पा १ व २ -** ३५ उप प्रकल्प (२७६ किमी रस्ते, १८ उड्डाणपूल, ३ खाडीपूल व २ रेल्वे मार्गावरील पूल) | २००७ | २,६०७ | २१९३.५७ | मे २०१८ | १)२१४ किमी रस्ते पूर्ण<br>२) सात उड्डाणपूल पूर्ण<br>३) उर्वरित कामे प्रगतीपथावर |
| **टप्पा-३ -** १७ उप प्रकल्प (३२ पूल व ३ भुयारी मार्ग व १३३ किमी रस्ते) | | ३,६२९ | | मे २०१८ | १० कामे प्रगतीपथावर. उर्वरित कामांची निविदा पूर्व प्रक्रिया सुरू |
| **मल्टी मॉडल कॉरिडोर विरार ते अलिबाग** | | | | | |
| वाहनांसाठी ८ मार्गिका व फक्त बसेस करिता राखीव मार्गिका असलेला खुला मार्ग बांधणे (१२६ किमी) | २०१० | ९,५०० | ९.३२ | डिसेंबर २०२३ | भूसंपादन व अन्य कामे प्रगतीपथावर |
| **मुंबई ट्रान्स हार्बर लिंक** | | | | | |
| शिवडी ते न्हावा सागरी सेतू (२२ किमी) | २०११ | १७,८४३ | ३६.९९ | डिसेंबर २०२१ | सल्लागाराची व कंत्राटदाराची नेमणूक करण्याकरिता स्वतंत्र निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर. |

*(स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०१६-१७)*

- **राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. युती शासनाकडून आघाडी शासनाच्या हाती सत्ता आली त्यावेळी राज्यावरील कर्जाचा बोजा रु. ४२ हजार ६६६ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या १७.२ टक्के) होता. वर्ष २००४-०५मध्ये आघाडी शासन दुसऱ्यांदा निवडून आले त्यावेळी हा बोजा रु. १ लाख ९ हजार १६७ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या २८.३ टक्के) एवढा वाढला होता. त्यावरील व्याज रु. १० हजार २५८ कोटी मिळून एकूण कर्ज १ लाख १९ हजार ४२५ कोटी रुपये इतके झाले होते. आता युती शासनाकडे पुन्हा राज्याची धुरा आलेली असताना राज्यावरील कर्ज हे ४ लाख ४४ हजार ७१ कोटींचे आहे.**

- **एकट्या मुंबईमागे ८९ हजार ५४९ कोटी खर्च करताना शासन राज्यातील जनतेला कर्जबाजारी करीत आहे. कर्जाचे प्रमाण असेच चालू राहिल्यास काही वर्षातच राज्य आर्थिक दिवाळखोरीत जाण्यास वेळ लागणार नाही.**

# करभरणा न करणाऱ्यालाच कर सवलत

**शासनाचे अजब धोरण:**

शासनाने दिनांक १ ऑगस्ट २०१५ पासून रु. ५०.०० कोटीपेक्षा कमी आर्थिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर भरण्यापासून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे व त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. यामुळे महानगरपालिकांच्या उत्पन्नामध्ये येणारी तूट भरून काढण्यासाठी शासनाकडून सहाय्यक अनुदान देण्यात येते.

## राज्य शासनाने रु. ७५ हजार ८७४ कोटी ८९ लाखाच्या महसूलावर सोडले पाणी

### निर्विवाद रकमांची वसुली विवादास्पद!

*तक्ता क्र. २* *( रु.कोटीत)*

| तपशील | वर्ष २०१४-१५ | वर्ष २०१५-१६ | वाढ |
|---|---|---|---|
| कर महसुलातील वसूल न केलेल्या विवादास्पद रकमा | ३४,४९०.५५ | ५१,१७०.५५ | १६,६८० |
| कर महसुलातील वसूल न केलेल्या निर्विवाद रकमा | २५,२२४.९२ | २१६३०.०६ | -३५९४.८६ |
| वसूल न केलेला करेतर महसूल | ३,१९२.४४ | ३०७४.२८ | -११८.४४ |
| **एकूण** | **६२९०७.९१** | **७५८७४.८९** | **१२९६६.९८** |

*(स्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, २०१७-१८)*

- **एकीकडे LBT / टोल मध्ये सूट व दुसरीकडे याच उद्योगांकडून महसूल येत नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी व मदत देण्यात हात आखडता घेणारे शासन व्यापारी उद्योगपतींवर सढळ हस्ते खुशी-खुशीने मदत करीत आहे.**
- **मोठ्या प्रमाणात महसूल बुडविणाऱ्या कंपन्या या 'वाहन, दारु उत्पादक व खनिज तेलाशी' निगडीत कंपन्या आहेत.**
- **राज्याचे कर्ज वाढत आहे. योजनांतर्गत खर्चासाठी राज्याजवळ पैसे नाहीत. अशावेळी आपले हितसंबंध जपण्यासाठी महसूलावर पाणी सोडणे हे भ्रष्टाचाराला चालना देण्यासारखे आहे.**

# राज्यात ३० लाख तरुण बेरोजगार

शासन राज्यामध्ये 'मेक इन इंडिया' कार्यक्रमादरम्यान रुपये ८लाख ४ हजार ८९७ कोटी प्रस्तावित गुंतवणूक व ३०.५ लाख अपेक्षित रोजगारासह ३,०१८ सामंजस्य करार करण्यात आल्याचे शासन सांगते. मात्र १९९१ ते २०१६ या कालावधीत राज्यात रुपये ११ लाख ३७ हजार ७८३ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीचे १९,०५३ औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी रुपये २ लाख ६९ हजार ८१४ कोटी (२३%) प्रस्तावित गुंतवणुकीचे ८,४९७ प्रकल्प (४४.६%) कार्यान्वित झाले. राज्यात सप्टेंबर २०१६ अखेर रुपये ५६ हजार ५५२ कोटी गुंतवणुकीचे व २९.१९ लाख रोजगार असलेले सुमारे २.४४ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कार्यरत होते. सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यात ६१.३ लाख आस्थापना असून ज्यामधील रोजगार १४५.१ लाख आहे. राज्यात आजही ३०लाख तरुण बेरोजगार व नोकरीच्या शोधात आहेत.

## सामंजस्य कराराच्या ७५% प्रकल्प कार्यान्वित नाहीत

### उद्योग गटनिहाय मंजूर प्रस्ताव व कार्यान्वित प्रकल्प

तक्ता क्र. ३ (ऑगस्ट १९९१ ते ऑक्टोबर २०१६)

| उद्योग गट | मंजूर प्रस्ताव | | कार्यान्वित प्रकल्प | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | गुंतवणूक ( रुपये कोटी) | संख्या | गुंतवणूक ( रुपये कोटी) |
| माहिती व तंत्रज्ञान | ४७६ | ३८७४३३ | २८९ | ५८३२२ |
| इंधन | ८२६ | १४२७६० | २०२ | २८१४७ |
| धातू | १९१९ | १०१३५४ | ९४८ | ३७०५५ |
| रसायने व खते | २८५९ | ६१२२७ | १३९७ | २२७०९ |
| वस्त्रोद्योग | २०१२ | ५०५९० | ९५८ | १७१६९ |
| साखर | १५५१ | ३९०१३ | २४७ | ८६०२ |
| परिवहन | ४२१ | ३२१४९ | २८५ | २४५५४ |
| फोटोग्राफी फिल्म्स व कागद | ९८१ | २८४१९ | ५७० | १३९८८ |
| सिमेंट जिप्सम | ३७३ | २५४५६ | १५० | ५७२६ |
| औद्योगिक यंत्रसामग्री | ८५१ | २४२०४ | ५०९ | ८८०२ |
| विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक्स | ११८१ | २२६३३ | ६८७ | ७९७८ |
| प्रक्रिया केलेले अन्न | १०५७ | २०५१५ | ४४७ | ५८६८ |
| वनस्पती तेल आणि वनस्पती | ३७४ | १६१०८ | २०४ | २३५० |
| औषधी | ८५९ | १६०८० | ४९९ | ४३८६ |
| कागद व कागद उत्पादने | ५५६ | १७११२ | २८१ | ७९७० |
| अभियांत्रिकी | ३६३ | १३६८१ | २०६ | ४६२२ |
| यंत्रसामग्री/सिरॅमिक/संकीर्ण उद्योग | ४६६ | ८२२१ | २९१ | ४४२२ |
| **इतर** | **२३१२** | **१३०८२८** | **४९४** | **७१४४** |
| **एकूण** | **१९४३७** | **११३७७८३** | **८६६४** | **२६९८१४** |

*आधार:उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन २०१६*

# झगमगत्या शहरांतील खरे वास्तव

महाराष्ट्राचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत असताना गरीब व श्रीमंत यामधील दरी दिवसेंदिवस वाढत आहे. राज्याचे आर्थिक सर्वेक्षण स्पष्टपणे राज्याची सरासरी, शहरी भागांतील जिल्हे व ग्रामीण जिल्हे या दरम्यानच्या दरडोई उत्पन्नातील तफावत दर्शविते. जर आपण नंदूरबार (रुपये ६६,११०), हिंगोली (रुपये ६६,९९८) आणि गडचिरोली (रुपये ७०,९११) यासारख्या ग्रामीण प्रतिनिधीत्व असणाऱ्या जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नाची तुलना केली तर आपणास असे दिसून येते की, पुणे (रुपये २,०४,०६०), ठाणे (रुपये २,१७,०९४) व मुंबईचे (रुपये २,५८,७४९) आहे. तर राज्याचे दरडोई उत्पन्न हे (रुपये १,४७,३९९) इतके आहे. मुंबई-ठाणे-पुणे व गडचिरोली-नंदूरबार- हिंगोली यांच्या दरडोई उत्पन्नातील तफावत साधारणत: रुपये १ लाख ९२ हजार ६३९ इतके भरते. तर राज्याच्या सरासरीची तफावत साधारणत: रुपये ८१ हजार २८९ इतकी भरते.

राज्यातील मोठ्या शहरात ३० ते ४०% जनता झोपडपट्टीत राहते. वीज, पाणी, घर यासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. असंघटित क्षेत्रात रोजंदारीवर जगणाऱ्या श्रमिकांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. सदैव असुरक्षित असणारे शहरी गरीब आपल्या अधिकारापासून वंचित आहेत.

## राज्याच्या दरडोई जिल्हा उत्पन्नाबाबत विषमतेची प्रचंड दरी

आलेख क्र. ३




*(स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०१६-१७)*

- **मुंबई जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न राज्यात सर्वात अधिक असून ते हिंगोलीसारख्या भागात जिल्ह्याच्या तिप्पटीपेक्षा जास्त आहे. हिंगोली, नंदूरबार, गडचिरोली हे ग्रामीण जिल्हे आहेत तर मुंबई, पुणे, ठाणे विकसित शहरी जिल्हे आहेत.**
- **उद्योग क्षेत्र, सेवा क्षेत्र तसेच कृषी क्षेत्राचा वाटा देखील हिंगोली, नंदूरबार व गडचिरोली जिल्ह्यात राज्याच्या इतर जिल्ह्यांशी तुलना करता नगण्य आहे.**

# विशेष आर्थिक क्षेत्रे ६८ मंजूर, कार्यान्वित फक्त २५

राज्याने २००६ पासून विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) धोरण स्वीकारले असून २०१६पर्यंत राज्यात २४३ विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. राज्यामध्ये ३१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत ६२ विशेष आर्थिक क्षेत्रांची अधिसूचना रद्द झाली किंवा मागे घेण्यात आली आता ६८ मंजूर असून फक्त २५ कार्यान्वित आहेत. मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्र याबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये देण्यात आली आहे.

## मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रे

तक्ता क्र. ४ (ऑक्टोबर २०१६पर्यंत)

| विभाग | विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या | | | क्षेत्र ( हेक्टर) | | | रोजगार (लाख) | | | गुंतवणूक ( रुपये कोटी ) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित |
| कोकण | ३२ | २३ | ६ | ८९८४ | २५२४ | २६१ | १४.९६ | ८.३३ | १०६५ | ५०२५७ | ३४५६८ | ७३६६ |
| पुणे | २१ | १८ | १४ | ७७७ | ७४६ | ७२४ | ७.४४ | १.७८ | १.७८ | ३४७२४ | ३४०११ | १२७०२ |
| नाशिक | २ | १ | ० | ११०७ | १००७ | ० | १.७५ | ० | ० | १८२३ | १३८० | ० |
| औरंगाबाद | ७ | ५ | ३ | ७०५ | ५५३ | ३७५ | १.०८ | ०.१६ | ०.१६ | २५३८ | १५३८ | ४४८७ |
| अमरावती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| नागपूर | ६ | ४ | २ | २८५० | १७४० | १६९९ | ५.४० | ०.०१ | ०.०१ | ८५१९ | ३८७२ | ७७०० |
| **एकूण** | **६८** | **५१** | **२५** | **१४४२३** | **६५७०** | **३०५९** | **३०.६३** | **३.६०** | **३.६०** | **९७८८१** | **७५३७७** | **३२२५५** |

*आधार: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१६*

## विदर्भ व मराठवाडा उपेक्षितच

सहकारी औद्योगिक वसाहतींची अवस्थाही बिकट आहे. १४२ पैकी फक्त १०७ कार्यरत आहे. कार्यरत नसलेल्या २४ सहकारी औद्योगिक वसाहती मराठवाडा व विदर्भातील आहेत. मराठवाड्यातील औरंगाबादमध्ये १८ पैकी १२ कार्यरत नाहीत, तर विदर्भातील अमरावती व नागपूर मध्ये २०पैकी १०कार्यरत नाहीत. कृषी क्षेत्राप्रमाणे उद्योग व सेवा क्षेत्रातही मराठवाडा व विदर्भ उपेक्षित असल्याचे दिसून येते.

## सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती

तक्ता क्र. ५ (नोव्हेंबर २०१६ पर्यंत)

| विभाग | मंजूर | कार्यरत | कार्यरत नसलेले | कार्यरत उद्योग घटक | भाग भांडवल (रुपये कोटी) | रोजगार |
|---|---|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | ४ | ३ | १ | ४७५ | - | १९४०० |
| कोकण (बृहन्मुंबई वगळून) | १४ | ९ | ५ | ६०२ | १.०१ | ९८८८ |
| नाशिक | ३३ | ३३ | ० | २१०९ | ४.९२ | ५०१०९ |
| पुणे | ४५ | ३८ | ७ | ३६६७ | ७.८७ | ८७३२८ |
| औरंगाबाद | १८ | ६ | १२ | ३१७ | १.०३ | ८२८ |
| अमरावती | १० | ४ | ६ | ११२ | ०.०३ | ७०२ |
| नागपूर | १० | ६ | ४ | ४४१ | ०.९७ | ४००१ |
| नांदेड | ८ | ८ | ० | ३१४ | ० | ७२१८ |
| **महाराष्ट्र** | **१४२** | **१०७** | **३५** | **८०३७** | **१५.८३** | **१७९४७४** |

*आधार: महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१६*

# शासकीय परिवहन सेवेची खाजगीकरणाकडे वाटचाल

राज्यातील रस्त्यांवरील वाहनांची १ जानेवारी २०१७ रोजी एकूण संख्या २.२कोटी होती (दर लाख लोकसंख्येमागे २४४११वाहने आणि दर किमी ९८ रस्त्याला वाहने). सन २०१६ मध्ये एकूण अपघातांची व अपघातात मृत झालेल्या व्यक्तींची संख्या अनुक्रमे ३९८४८ व १२८८३होती.

सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक व्यवस्था हे शहरातील वाहतुकीचे प्रमुख साधन आहे. राज्यातील २३ शहरात ही सुविधा उपलब्ध आहे. यापैकी सात शहरात (औरंगाबाद, नांदेड, नाशिक, सांगली-मिरज, रत्नागिरी, चंद्रपूर आणि वसई-विरार-नालासोपारा) मरामाप महामंडळ ही वाहतूक सेवा पुरविते. बृहन्मुंबई बेस्ट, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ आणि उर्वरित १३ शहरात संबंधित नगरपरिषद/महानगरपालिका वाहतूक सेवा पुरवितात. शहरी सार्वजनिक वाहतूक विषयक आकडेवारी खालील तक्त्यामध्ये दिली आहे.

## शहरी सार्वजनिक वाहतूक विषयक आकडेवारी

तक्ता क्र. ६

| वाहतूक सेवा पुरविणारी संस्था | मार्गस्थ बसेसची प्रतिदिन सरासरी संख्या | | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख किमी) | | निव्वळ नफा/तोटा (रुपये लाख) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६ | २०१५ | २०१६ | २०१५ | २०१६ | २०१५ | २०१६ |
| बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) | ३,६३६ | ३४६६ | ३३.४७ | २८.९९ | ६.६८ | ६.४० | -८५,८०२ | -१,०६,१९२ |
| पुणे माहनगर परिवहन महामंडळ | १,३६४ | १४४७ | १२.१७ | ११.२४ | ३.१४ | ३.१३ | -१६,७६९ | -१,५१८१ |
| मरामाप महामंडळ (शहर वाहतूक) | ४८२ | ४८५ | २.४४ | २.४० | ०.९१ | ०.८९ | -२,६८८ | -२२५१ |
| नागपूर महानगरपालिका परिवहन | २४० | २४० | १.३५ | १.२४ | ०.४२ | ०.४३ | -२,५३४ | -२४४० |
| नवी मुंबई महानगरपालिका परिवहन | २४३ | २५७ | २.१९ | २०३१ | ०.६७ | ०.७२ | -३,२०९ | -४१५९ |
| ठाणे महानगरपालिका परिवहन | १७४ | १९२ | १.७१ | १.५७ | ०.३४ | ०.३६ | -३,७९६ | उपलब्ध नाही |
| कोल्हापूर महानगरपालिका परिवहन | ९२ | १०१ | ०.७१ | ०.६० | ०.२१ | ०.२४ | -८६ | -६९२ |
| वसई-विरार महानगरपालिका परिवहन | ११० | ११५ | ०.९६ | ०.८५ | ०.२२ | ०.२४ | -३९६ | -१४० |
| कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन | ७५ | ८३ | ०.४० | ०.४६ | ०.१३ | ०.१६ | -१,७६४ | -१,२१६ |
| सोलापूर महानगरपालिका परिवहन | ६९ | ९६ | ०.४८ | ०.७२ | ०.१६ | ०.२३ | -३७८ | -५०२ |
| मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन | ३९ | ३० | ०.२४ | ०.१९ | ०.०९ | ०.०५ | -२१६ | -३१० |
| अमरावती महानगरपालिका परिवहन | ३३ | ३३ | ०.०३ | ०.२८ | ०.०८ | ०.०८ | ७ | ७ |
| अहमदनगर महन्नरपालिका परिवहन | १८ | १८ | ०.११ | ०.११ | ०.०२ | ०.०२ | -७२ | -७२ |
| खोपोली नगरपालिका परिवहन | ११८ | १३ | ०.१७ | ०.४३ | ०.०२ | ०.०२ | - नगण्य | १२ |

*आधार: बेस्ट, संबंधित नगरपालिका, महानगरपालिका, पुणे महानगर परिवहन महामंडळ व मरामाप महामंडळ*

- **शासकीय परिवहन सेवा जाणीवपूर्वक मोडीत काढायची शासनाची योजना दिसतेय. तेजस्विनी बसेसची घोषणा करताना राज्यातील परिवहन सेवा व शहरातील परिवहन सेवा मजबूत सक्षमीकरण करण्याबाबत शासन उदासिन दिसतेय. एकीकडे शासकीय परिवहन सेवा भरीव तरतूद न करता मोडीत काढणे व दुसरीकडे खाजगी वाहनाकरिता प्रतिवर्ष १०००-१२०० कोटी टोलमाफी. यावरून परिवहन सेवेबाबत शासनाचे खाजगीकरणाकडे जाण्याचे धोरण स्पष्ट होते.**

# ''घोषणा मोठ्या, कृती शून्य''

## ७ वर्षात महाराष्ट्रात १९ लाख घरे कशी बांधणार?

मुंबई तसेच राज्याच्या काही भागात घरे उपलब्ध करून देण्याकरिता म्हाडाची स्थापना सन १९७७ मध्ये करण्यात आली. स्थापनेपासून डिसेंबर २०१६ पर्यंत म्हाडाने एकूण ४,६०,८४७ सदनिकांचे बांधकाम व पुनर्विकास केला आहे.

फेब्रुवारी २०१५ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण धोरणाबाबत चर्चा सुरू झाली. मात्र आजही हे धोरण प्रलंबित आहे. नवीन गृहनिर्माण धोरण अंमलात येत नाही तोपर्यंत शासन कोणते गृहनिर्माण धोरण अंमलात आणणार आहे? त्यातच शासनाने अनधिकृत बांधकामांना अधिकृत करण्याचे आदेश दिले. अनधिकृत बांधकामांना मान्यता देण्याचे आदेश कोणत्या धोरणानुसार आहेत?

पंतप्रधान आवास योजना दिनांक १७.०६.२०१५ रोजी सुरू झाली असून ती ३१.०३.२०२२ पर्यंत सुरू राहील असे सांगण्यात येत आहे. या ७ वर्षामध्ये राज्यात १९ लाख तर मुंबई मनपा क्षेत्रात ११ लाख घर बांधण्याचा संकल्प आहे. हा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येक वर्षी किमान ३ लाख घरे निर्माण करावी लागतील. महाराष्ट्र मंत्रिमंडळात असा निर्णय घेण्यात आला होता की झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) योजना ज्या शहरांमध्ये सुरू असेल तेथे प्रधानमंत्री आवास योजना लागू केली जाणार नाही.

एसआरए योजना ही रेल्वे आणि केंद्र शासनाच्या जागांवर असलेल्या झोपड्यांना लागू होत नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र शासन मुंबई शहर झोपडपट्टीमुक्त कसे करू शकेल? सर्वांना घरे कशी देणार? मुंबई मध्ये ११ लाख घरे व एकूण राज्यातील १९ लाख घरे कशी देणार? त्यासाठीचे नियोजन व रोड मॅप काय? आदिवासी पाडे, कोळीवाडे, गावठाणातील घरे याबाबत राज्य शासनाची भूमिका काय?

### म्हाडाकडून २०११ ते २०१६ दरम्यान बांधण्यात आलेल्या सदनिका व मालकीचे भूखंड

तक्ता क्र. ७ (संख्या)

| वर्ष | आर्थिक दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्य उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | | एकूण सदनिका $ | भूखंडाची संख्या | खर्च @ (रुपये कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सदनिका | संक्रमण शिबिरे | | | |
| २०११-१२ | ८१५ | २,९४१ | २३८ | ३८८ | १२२ | - | ४,५०४ | ७९४ | ९२८.९४ |
| २०१२-१३ | १२४ | १,२९८ | ३१८ | १९७ | ३७८ | - | २,३१५ | २२४ | ४६५.४५ |
| २०१३-१४ | १,५४२ | ४,६२७ | ६८७ | ४६९ | ९९ | ३५६ | ७,४२४ | ४३३ | ८५०.४२ |
| २०१४-१५ | ९१५ | १,१३६ | १,२९० | १९६ | ७१ | ८५५ | ३,६०८ | ० | ४२४.३८ |
| २०१५-१६ | ८६५ | ५,२४० | २,९८९ | १४ | ७८२ | ४३९ | ९,८९० | ० | १,६४०.१७ |
| २०१६-१७ | १५२ | ४३० | ५८० | ६८ | ६० | ० | १२९० | ० | १,०२१.७६ |

*आधार: म्हाडा, मुंबई*

# बेघरांना घर

मा. सुप्रीम कोर्टाने २०१० रोजी दिलेल्या निर्देशानुसार सर्व महत्त्वाच्या शहरांमध्ये जेथे पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या आहे तेथे एक लाख लोकसंख्येमागे एक असे रात्र निवारे बांधावेत असे नमूद करण्यात आले. २०१४ मध्ये राष्ट्रीय शहरी रोजगार अभियानामार्फत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक १०० बेघर व्यक्तीमागे १ निवास असावा. २०११ च्या जनगणनेनुसार एकट्या मुंबईत सध्या ५७,४१६ बेघर नागरिक आहेत. परंतु सद्यस्थितीत मुंबईत केवळ ७ निवारे दिसून येतात. म्हणजेच मुंबईत ८,२०० बेघरांमागे केवळ १ निवासस्थान आहे. शहरी बेघरांसाठी निवारे या योजनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे मुंबईत ५७४ बेघर निवाऱ्यांची गरज आहे.

नगर परिषद प्रशासन संचालनाकडून माहिती अधिकाराअंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार राज्यातल्या इतर सर्व महानगर हद्दीतील एकूण बेघरांची संख्या ५४,५२७ इतकी आहे. बेघरांसाठी बांधलेल्या निवासस्थानांची संख्या ३१ आहे. याचाच अर्थ राज्यामध्ये १८००बेघरा मागे एक निवासस्थान आहे.

**शहरी गरिबांच्या गरिबीचे उच्चाटन होण्यासाठी सुरू करण्यात आलेली राष्ट्रीय शहरी रोजगार अभियानातील बेघरांसाठी निवारे ही योजना अजूनही कागदावर आहे असे दिसून येते.**

# दलित, आदिवासी, श्रमिक वसाहतींना पाणी पुरवठा नाकारला

## शासन करतेय मुंबई उच्च न्यायालयाचा व संविधानाचा अवमान:

मुंबई हायकोर्टाने आपल्या आदेशात लोकवसाहतीत राहणाऱ्या श्रमिकांच्या मूलभूत अधिकाऱ्यांचे संवर्धन करत सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य शासनास स्पष्ट केले की , लोक वसाहतीत असणारी घरे जरी अनधिकृत असली तरी त्यातील निवासी नागरिकांना पाण्याची जोडणी मिळणे अत्यावश्यक आहे. पाणी व जगण्याच्या महत्वाच्या संबंधाला अधिक मजबुतीने मांडणी करण्यात आली की, पाण्याचा हक्क हा जगण्याचा मूलभूत हक्क आहे. सर्वांना पाणी उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यानुसार न्यायालयाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्था विशेषत बृहन्मुंबई महानगरपालिकेला फेब्रुवारी २०१५ च्या आत पाणी पुरवठा धोरणाचा प्रस्ताव देण्याचे आदेश दिले.माननीय न्यायालयाचे आदेश असूनही व कोर्टात राज्य सरकारने सर्वांना पाणी देण्यासाठी मान्य केलेले असताना देखील मुंबई महानगरपालिकेने परिपत्रक काढून पाणी देण्याचे नाकारले यामुळे तब्बल १५ लाख मुंबईकरांना कायदेशीर पाणी पुरवठा न मिळाल्यामुळे पाणी माफियांवर अवलंबून रहावे लागत आहे. या पाणी माफियांकडून वाजवी दरापेक्षा शेकडो पटीने जास्त किमतीत पाणी विकत घ्यावे लागते. या निर्णयामुळे महानगरपालिकेच्या महसूलात ही तोटा निर्माण होत असून यामध्ये दलित, आदिवासी, गरीब-श्रमिक जनतेची आर्थिक पिळवणूक देखील होत आहे.

# गुड गर्व्हनन्सचे काय झाले ?

महाराष्ट्र शासनाने १३ जुलै २००९ रोजी महानगरपालिका कायद्यांमध्ये सुधारणा केली. (२००९ ची २१ वी सुधारणा) या अन्वये नगरसेवकाच्या प्रभागाच्या पातळीवर क्षेत्र सभांची (CPL) निर्मिती करणे आणि या क्षेत्र सभांना कृतीशील होण्यासाठी आवश्यक संसाधने आणि सहाय्य पुरविणे आवश्यक होते. आजपर्यंत या सुधारणेची अंमलबजावणी करण्याचे आदेश नगरविकास विभाग यांच्याकडून दिले गेलेले नाहीत. लोक सहभागाने शासकीय व्यवहारात पारदर्शकता येऊन शासनाचे उत्तरदायित्व वाढते. यातूनच लोकशाहीला बळकट होण्याची प्रक्रिया होत असते मात्र शासनाने या सुधारणांच्या अंमलबजावणीकडे पूर्णत: दुर्लक्ष केलेले आहे.

# आज मुंबई पुणे तर, उद्या सर्वच शहरांपुढे कचऱ्याचा प्रश्न

मुंबईत दररोज सुमारे ७.५ हजार टन ( ७५लाख किलो) कचरा निर्माण होतो. मुंबई द्वीपाचा पृष्ठभाग आहे ४५० चौरस किलोमीटर तर लोकसंख्या एक कोटीपेक्षा जास्त. मुंबईतील कचरापट्ट्या ८-१० वर्षापूर्वीच भरून ओसंडून वाहू लागल्या आहेत. कचरा व्यवस्थापनाला घरघर लागून इतका काळ लोटला आहे की सर्वसामान्यांच्या मनात या प्रश्नांविषयी निराशा भरून राहिली आहे. आता धुरामुळे राहवत नाही म्हणून कचऱ्याच्या संदर्भात आरडाओरड व निदर्शने दिसून येतात. देशाच्या आर्थिक राजधानीची प्रतिष्ठा कचऱ्यासह जळून खाक होते आहे व जनतेच्या मनात चिंतेच्या धुराचे ढग दाटले आहेत.

राज्यातील शहरामध्ये प्रती दिवशी २२,५६३.७० मेट्रीक टन (कोटी किलो) कचरा निर्माण होतो व फक्त ५,९२६.६० मेट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया होते. म्हणजे फक्त २६.३०% कचऱ्यावर प्रक्रिया होते. वरील आकडे फक्त स्थानिक स्वराज संस्थेद्वारे उचलला जाणारा कचरा आहे. यापेक्षा कित्येक पटीने कचरा शहरात रस्तो-रस्ती पडलेला दिसून येतो. यावरून ही समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येते.

### राज्यातील सन २०१४-१५ मध्ये स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील घनकचरा निर्मिती व प्रक्रियेची माहिती

तक्ता क्र.८

*(प्रति दिवस मे. टन मध्ये)*

| स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | संख्या | महापालिका घन कचरा | | |
|---|---|---|---|---|
| | | निर्मिती | प्रक्रिया | |
| | | १९,६९०.०० | ५,५१६.५० | २८.०० |
| अ वर्ग नगरपालिका | १२ | ५७९.०० | ११९.०० | २०.०६ |
| ब वर्ग नगरपालिका | ६१ | १,०७७.२० | २१९.६० | १०.३ |
| क वर्ग नगरपालिका | १४६ | १,०६५.०० | | |
| नगर पंचायत/ कटक मंडळे | १३ | १५२.५० | ७१.५० | २६.९ |
| **एकूण** | **२५८** | **२२,५६३.७०** | **५,९२६.६०** | **२६.३** |

*आधार: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ*

# राज्यात अग्निशामक यंत्रणेची वानवा

महाराष्ट्र राज्यात राज्यस्तरीय अग्निशमन सेवा उपलब्ध नाहीत आणि अग्निशमनाचे काम प्रामुख्याने नागरी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती तसेच विशेष नियोजन प्राधिकरणे उदा. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको इत्यादी मार्फत केले जाते. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार कौन्सिलच्या शिफारशीनुसार राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्या अग्निशमन सेवेतील त्रुटींचा आढावा या कार्यालयाने घेतला असून त्यानुसार अत्यल्प महानगरपालिका वगळता सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अग्निशमन सेवेत मोठी तूट आहे. ३५० स्थानिक स्वराज्य संस्थेपैकी तब्बल १०६ स्थानिक स्वराज्य संस्थांकडे अग्निशमन सेवा उपलब्धच नाही. उरलेल्या सेवा फारच त्रोटक आहेत. १० किमी मध्ये १ केंद्र आवश्यक असताना राज्यातील एकाही शहरात नाही. महाराष्ट्रातील ज्या महानगरपालिका / नगरपरिषदा यांचेकडे अग्निशमन सेवा आहेत/नाहीत त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**महाराष्ट्रातील अग्निशमन यंत्रणा**

तक्ता क्र.९

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | एकूण | अग्निशमन सेवा | |
|---|---|---|---|---|
| | | | आहेत | नाहीत |
| १ | अ +वर्ग महानगरपालिका | १ | १ | ० |
| २ | अ-वर्ग महानगरपालिका | २ | २ | ० |
| ३ | ब- वर्ग महानगरपालिका | ३ | ३ | ० |
| ४ | क-वर्ग महानगरपालिका | ४ | ४ | ० |
| ५ | ड-वर्ग महानगरपालिका | १६ | १६ | ० |
| ६ | अ-वर्ग नगरपरिषदा | १२ | १२ | ० |
| ७ | ब-वर्ग नगरपरिषदा | ६१ | ६१ | ० |
| ८ | क-वर्ग नगरपरिषदा | १५६ | १४२ | १४ |
| ९ | नगरपंचायती | ९५ | ३ | ९२ |
| **एकूण** | | **३५०** | **२४४** | **१०६** |

*आधार: शासन निर्णय २०*

- **नियोजन, काटेकोर अंमलबजावणी व समन्वयाचा अभाव यामुळे राज्यातील शहरांपुढील समस्या वाढत आहेत, पाणी, वीज, मूलभूत सेवा-सुविधा सोबत प्रदूषण, घनव्यवस्थापन, परिवहन, अग्निशामक यंत्रणा आदि बाबतीत शासन निर्णय घेण्यात कमी पडत आहे. देशातील इतर राज्य महाराष्ट्रापेक्षा वेगाने प्रगती करीत असताना राज्याने त्वरित योग्य नियोजनाद्वारे राज्याचा विकास साधला पाहिजे.**